सर्व महाविद्यालये, (पुणे जिल्हा)
-----------------------------------
-----------------------------------

विषयः सन २०१८-१९ व २०१९-२० (महाडीबीटी प्रणालीद्वारे) या कालावधीतील शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क तसेच राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती व विद्यावेतन प्रतीपूर्ती योजनांच्या पीएफएमएस रकमेच्या प्रलंबिततेबावत.

संदर्भ : १.या कार्यालयाचे पत्र क्र.३०६२, दि.२.९.२०२०.
२.मा.सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/ भासशि/का-४ ड/महाडीबीटी/२०२०-२१/७८५८, दि.२४.९.२०२०.
३.मा.सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/ भासशि/का-४ क/२०२०-२१/१५६४५, दि.१९.१०.२०२०.
४.या कार्यालयाचे पत्र क्र.सआसकुपणे/भासशि/महाडीबीटी पोर्टल २०१९-२०/ शिष्यवृत्ती/२०-२१/३५७४, दि.२२.१०.२०२०.
५.दि.२४.११.२०२० रोजी मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली व्हीडीओ कॉन्फरन्सध्ये झालेली चर्चा.
६. या कार्यालयाचे पत्र क्र.४०६१ दि.२६.११.२०२०
७. मा.प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग पुणे यांचे पत्र जा.क्र. २९०५ दि.०१.१२.२०२०
८. या कार्यालयाचे पत्र क्र. ४१२१ दि. ०२.१२.२०२०.
९. दि. ०३.१२.२०२० व दि. ०५.१२.२०२० रोजी घेण्यात आलेली गुगल मीट वरील बैठक

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भ क्र. २ व ३ च्या पत्रान्वये अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०१८-१९ व २०१९-२० या कालावधीतील प्रलंबित शिष्यवृत्ती/फ्रिशिपचे अर्ज तातडीने निकाली काढणेबावत सुचित केले आहे. त्याअनुषंगाने यापुर्वी या कार्यालयाचे पत्र क्र.३५७४, दि.२२.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये आपणांस कळविण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्र.१ अन्वये आपणांस यापुर्वी कळविण्यात आले आहे.

तथापि अद्यापही काही महाविद्यालयांचे अर्ज त्रुटीपुर्ततेअभावि प्रलंबित असून सदरील प्रलंबित अर्जाची संख्या ३७७१ इतकी दिसत असल्याने दि.२४.११.२०२० रोजी झालेल्या व्हीडीओ कॉन्फरन्सध्ये मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अत्यंत नाराजी व्यक्त केली असून सदरील अर्जाची त्रुटीपुर्तता करुन घेऊन अर्ज तात्काळ निकाली काढणेबाबत आदेशित केले आहे.

## Circulars about Scholarship and Freeships

त्याअनुषंगाने आपणांस पुनश्च: कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ व २ च्या पत्राच्या अवलोकन व्हावे व त्यामध्ये नमुद केलेल्या सन २०१८-१९ व २०१९-२० (महाडीबीटी प्रणालीद्वारे) मधील विविध अडचणींचे विद्यार्थी तसेच महाविद्यालय स्तरावरच प्रामुख्याने निपटारा करण्याबाबतच्या सुचनांचा वापर करुन विद्यार्थी व महाविद्यालयाने तात्काळ अवलंब करुन प्रलंबित असलेली शिष्यवृत्ती अदायगी त्यांच्या बँक खात्यामध्ये करुन घेण्यास्तव त्वरीत दि.३.१२.२०२० पर्यंत कार्यवाही करणेबाबत सुचित केले होते.

उपरोक्त सुचनांच्या अनुरोधाने मा.आयुक्त समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी सूचित केल्यानुसार संबंधित महाविद्यालयांना खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

अ) महाविद्यालयांतील प्राचार्य यांना विशेष सुचना :-

१. महाविद्यालय स्तरावरील Scrutiny पर्यायाचा वापर करुन प्रलंबित अर्ज फॉरवर्ड करता असताना प्रणालीमध्ये दर्शविण्यात आलेल्या सर्व बाबींची खात्री करुन तपासूनच पात्र अर्ज मंजुरीकरीता विहित मुदतीत जिल्हा कार्यालयास प्रणालीद्वारे ऑनलाईन पाठविण्यात यावेत.

२. ज्या विद्यार्थी व महाविद्यालय यांना शिष्यवृत्तीचा पहिला हप्ता मिळालेला आहे त्यांनी दुस-या हप्त्याकरीता महाविद्यालय लॉगिनमधुन द्वितीय सत्राची उपस्थिती अद्ययावत करुनच अर्ज मंजुरीकरीता विहित मुदतीत पाठवावेत.

३. महाविद्यालयाच्या लॉगिनमध्ये "ALLOTMENT DATE WISE REPORT" या पर्यायाचा वापर करुन अर्ज ALLOTE झाला की नाही, याची महाविद्यलयाने वेळोवेळी पडताळणी करणे आवश्यक आहे व NOT ALLOTED अर्जांबाबत त्रूटीपूर्तता करणेसाठी संबंधित विद्यार्थ्याला त्वरीत याबाबत अवगत करावेत.

४. महाविद्यालय यांना लॉगिनमधील DBT DASHBOARD या पर्यायाचा वापर करुन शिष्यवृत्तीबाबतचा महाविद्यालय निहाय तपशिलवार अहवाल दिसून येतो.

५. महाविद्यालय लॉगिनमध्ये Institute Disbursement Report, Student Disbursement Report व Status wise Aplication Detail Report या तीनही पर्यायामध्ये विद्यार्थी व महाविद्यालय यांना शिष्यवृत्ती वितरण झालेल्या स्थितीचा अहवाल दिसून येतो.

६. महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगिनमध्ये "Support Desk" मध्ये अर्ज क्रमांक निहाय (Search) शोध घेतल्यास अर्ज क्रमांकाला क्लिक केल्यानंतर सदर अर्जावर झालेली कार्यवाही, विद्यार्थी व महाविद्यालयाला मिळणा-या व मिळालेल्या रकमेचा तपशिल आणि अर्जासंबंधित PFMS पोर्टल बाबतच्या त्रुटींची माहिती महाविद्यालय लॉगिनमध्ये विद्यार्थीनिहाय प्रणालीमध्ये दर्शविण्यात येत आहे. त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांचे आधार अथवा बँक खात्यासंबंधित त्रूटी असल्यास संबंधित विद्यार्थ्याला त्वरीत याबाबत अवगत करावे.

७. विद्यार्थी व महाविद्यालयांना महाडीबीटी पोर्टलवरील अडचणींबाबत तक्रार करण्यासाठी Grievance/Suggestions या पर्यायाचा वापर करावा.

ब) महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सूचना :-

१. अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी नवीन अर्ज भरत असताना आधार नोंदणीकृत अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. सन २०१८-१९ व २०१९-२० मध्ये ज्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी नॉन आधार अर्ज भरले आहेत अशा विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रोफाईलमध्ये जावून आधार क्रमांक तसेच आधार संलग्नीकृत बँक खात्याची माहिती अद्यावत करुन घेणे आवश्यक आहे.

३. अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न आहे की नाही याची पडताळणी/खातरजमा आधार पोर्टल https://resident.uidai.gov.in/bank-mapper या लिंक वरती जाऊन करावी, तसेच आधार ॲक्टिव आहे किंवा कसे याबाबत देखील सदर पोर्टल वरुन खातरजमा करावी.

## Circulars about Scholarship and Freeships

४. विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टल वरील प्रणालीद्वारे निर्गमित झालेले पेमेंट व्हॉऊचर विद्यार्थी लॉगिनमध्ये जाऊन त्वरीत रीडीम करावेत. यासाठी विद्यार्थ्यांनी आपल युजर आयडी व पासवर्ड जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

५. महाडीबीटी प्रणालीमध्ये नोंदणीकृत होत असतांना जे लॉगिन आयडी विद्यार्थ्याने तयार केलेला आहे तोच लॉगिन आयडी विद्यार्थ्यांनी कायमस्वरुपी लक्षात ठेवून वापरावा. जेणेकरुन भविष्यात याबाबत कोणताही लॉगिन आयडी दुबार तयार होणार नाही तसेच आपला लॉगिन आयडी व पासवर्डची माहिती गोपनीय ठेवल्यास त्याचा दुरूपयोग होणार नाही.

तसेच संदर्भ क्र. ६ च्या पत्रान्वये आपणास प्रलंबित शिष्यवृत्तीबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. संदर्भ क्र.७ अन्वये मा.प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग पुणे यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत विचारणा केलेली आहे. संदर्भ क्र. ८ अन्वये एक्सलशीट पाठविण्यात आलेली होती सदरील एक्सलशीट मध्ये स्तंभ क्र. २ मध्ये आपल्या महाविद्यालयासमोर फिल्टर लावावा. स्तंभ क्र.३ मध्ये पी. एफ. एम. एस. प्रणालीनुसार प्रलंबीत विद्यार्थी अर्जांची संख्या दर्शविण्यात आलेली आहे. तसेच स्तंभ क्र.४ मध्ये प्रलंबित विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांशी महाविद्यालयाने संपर्क केला अशा विद्यार्थ्यांची संख्या दर्शविणे अनिवार्य आहे आणि स्तंभ क्र. ५ संपर्क केल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांची रक्कम पीएफएमएस प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा झालेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या दर्शवीनेबाबत व शेरा या स्तंभामध्ये या व्यतिरिक्त अन्य माहिती देणेबाबत कळविले होते.

तरी उपरोक्त दिलेल्या सुचनांचा व बँक खाते आधार संलग्नीकृत करावयाच्या पर्यायांचा वापर करुन विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी तात्काळ अवलंब करुन प्रलंबित असलेली शिष्यवृत्तीची अदायगी त्यांच्या बँक खात्यामध्ये करुन घ्यावयाची आहे. सदरील कामकाजास प्रथम प्राधान्य देऊन तात्काळ दि. ३.१२.२०२० रोजी पर्यंत कार्यवाही करुन त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करणेबाबत सुचित केले होते परंतु अद्याप एकाही महाविद्यालयाने सदरबाबत माहीती सादर केलेली नाही. सदरबाबत संदर्भ क्र. ९ अन्वये महाविद्यालयांची गुगल मीट वर दोनदा ऑनलाईन बैठक घेऊन त्यांना PFMS प्रलंबिताबाबत वारंवार सुचना देण्यात आलेल्या आहेत. आयुक्तालयामार्फत प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन केले असता आधार क्रमांकाचे NPCI मॅपींग न केल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती रक्कम वितरित झाली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्याअनुषंगाने आपणास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या विद्यार्थी यादीतील NPCI मॅपींग न झालेल्या विद्यार्थ्यांशी तात्काळ संपर्क करुन तसेच त्यांच्या बँक खाते असलेल्या बँक शाखेशी संपर्क करुन NPCI मॅपींग करण्याची कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे सदर बँकानी देखील अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून NPCI मॅपींग करण्याची कार्यवाही तात्काळ प्रथम प्राधान्याने करावी.

सदरच्या कामकाजामध्ये कोणत्याही प्रकारे दिरंगाई अथवा हलगर्जिपणा केल्याचे आढळुन आल्यास संबंधित महाविद्यालयास जबाबदार धरण्यात येईल व नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करणेबाबत वरिष्ठ कार्यालयास प्रस्तावित करण्यात येईल, याची गांभीर्यपुर्वक नोंद घ्यावी.

तसेच मा.आयुक्तालयाच्या पत्रामध्ये नमुद केलेल्या कार्यप्रणालीचा अवलंब करुनही अथवा न करता जर अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित राहुन, विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाचे प्राचार्य, संबंधित संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांची राहील व याबाबत सामाजिक न्याय विभागाची जबाबदारी राहणार नाही, याचीही गांभीर्यपुर्वक नोंद घ्यावी.

(संगिता डावखर)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, पुणे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.
१.मा.आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे.
२.मा.सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
३.मा.प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग पुणे.

## Circulars about Scholarship and Freeships

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१**
web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य.१९-२०/डीबीटी/ 2162 दि. १८.०२.२०२०

तात्काळ ईमेलद्वारा

18 FEB 2020

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित,
विना अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीबाबत.
संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७
२. शासन निर्णय क्र. मातंस-२०१८/प्र.क्र. १३८/से-१/३९, दि. १२.१०.२०१८
३. संचालनालयाचे दि. ३०.०७.२०१९, दि. ३१.०७.२०१९, दि. ९.०८.२०१९, दि. २०.०८.२०१९, दि. ७.१०.२०१९, दि. १५.१०.२०१९, दि. १.११.२०१९, दि. ४.११.२०१९, दि. ६.११.२०१९, दि. १३.११.२०१९, दि. १६.११.२०१९, दि. २६.११.२०१९, दि. १२.१२.२०१९, दि. १८.१२.२०१९, दि.२३.१२.२०१९ दि. २३.१२.२०१९, दि.१५.०१.२०२०, दि.२७.०१.२०२०, दि.०१.०२.२०२०, दि. ०६.०२.२०२०, दि. ७.०२.२०२० व दि. १५.०२.२०२० रोजीचे पत्र.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. विद्यार्थी / महाविद्यालयांच्या मदतीसाठी डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच संदर्भिय संचालनालयाच्या पत्रान्वये वेळोवेळी लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

मागील वर्षी सन २०१८-१९ करीता ज्या विद्यार्थ्यांना सदरची शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे, अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या सन २०१९-२० या वर्षातील नुतनीकरणासाठी अर्ज भरावयाचा आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरलेले नाहीत किंवा प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांनी सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरतांना नवीन मंजूरी (फ्रेश स्कॉलरशिप) या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरणे आवश्यक आहे.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी सन २०१९-२० करीता प्राप्त झालेल्या अर्जाचे प्रमाण हे मागील वर्षीच्या तुलनेत कमी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे, ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अद्यापही शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरलेले नाहीत अशा **विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन अर्ज भरणेसाठी दि. २९.०२.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.**

मुदतवाढीनंतरही सदर योजनेसाठी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद अल्प असल्याचे दिसून येत आहे, तरी याबाबत विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता, शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शक्य तितक्या लवकर महाडीबीटी पोर्टलवरुन अर्ज भरावेत तसेच यासाठी महाविद्यालयांनी विशेष कार्यशाळा आयोजीत करुन त्यांचे महाविद्यालयामधील शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरणेबाबत सहाय्य करावे. जेणेकरुन एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही.

## Circulars about Scholarship and Freeships

तसेच महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची **महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. ८ मार्च, २०२० तसेच विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १५ मार्च, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.** महाविद्यालय व विभाग स्तरावरुन अर्जांची पडताळणी करणेसाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली असून, यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. मुदतीनंतर प्रलंबित राहीलेले अर्ज सिस्टीमद्वारे आपोआप रिजेक्ट होतात.

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर इन्स्टिटुट लॉगीन वरुन उपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय, संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होणार नाही. महाविद्यालयांनी कोणत्याही परिस्थितीत त्यांचे स्तरावर शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत.

तसेच सद्यस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जांची स्थिती तपासावी. डीडीओ द्वारे लाभ वितरीत केल्यास रीडीम बटण सक्रिय होते. **शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी रीडीम बटणावर क्लिक करणे आवश्यक आहे.** सदरची बाब संबंधित विद्यार्थ्यांना त्यांचे महाविद्यालयांमार्फत कळविण्यात यावी.

महाविद्यालयांमधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे तसेच विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज त्यांचे स्तरावर पडताळणीसाठी प्रलंबित राहील्यामुळे भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या बाबीस संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य व्यक्तीशः जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :-
१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

## Circulars about Scholarship and Freeships

महाराष्ट्र शासन

**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, पुणे.**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टेशनसोर,येरवडा, पुणे-०६

दुरध्वनी क्रमांक: ०२०-२९७०६६११ E-mail : acswopune@gmail.com

जा.क्र.सआसकपुणे/मासशि/महाडीबीटी/प्रलंबित अर्ज/२०२१-२२/२२७३/ दि.०९.०५.२०२१

प्रति,

प्राचार्य,

अनुदानित / कायम विनाअनुदानित

व्यावसायिक / बिगर व्यावसायिक

कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये (पुणे जिल्हा)

विषय :- सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील महाडीबीटी पोर्टलवरील प्रलंबित अर्ज निकाली काढणेबाबत.

संदर्भ :- मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.०५.०५.२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्देश.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील महाडीबीटी पोर्टलवरील प्रलंबित अर्जाबाबत मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५.०५.२०२२ रोजी आढावा बैठक घेण्यात आली तसेच दि.०९.०५.२०२२ रोजी मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांनी आढावा बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज मोठया प्रमाणात महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असल्याबाबत मा. आयुक्त महोदय आणि मा. संचालक महोदय यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली व प्रलंबित अर्ज तात्काळ निकाली काढण्याच्या सक्त सूचना दिलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जाचा आढावा घेतला असता, आपल्या महाविद्यालयाचे शिष्यवृत्ती अर्ज आपल्या स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाब अतिशय गंभीर असून शिष्यवृत्तीच्या अर्जावर कार्यवाही करण्यात आपल्याकडून दिरंगाई झाल्याचे दिसून येत आहे.

मा. आयुक्त महोदय आणि मा. संचालक महोदय यांनी केलेल्या सूचनेनुसार सदर अर्जावर तात्काळ कार्यवाही करावी. आपणआपले स्तरावरील प्रलंबित शिष्यवृत्ती अर्जावर कार्यवाही न केल्यास व त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्व जबाबदारी आपणावर निश्चित करण्यात येईल याची गांभिर्यपूर्वक नोंद घ्यावी.

सोबत- अर्ज प्रलंबित महाविद्यालयांची यादी

(संगिता डावखर)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

२. मा. प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, पुणे - ०६

## Circulars about Scholarship and Freeships

महाराष्ट्र शासन

### सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, पुणे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टेशनसोर,येरवडा, पुणे-०६.
दुरध्वनी क्रमांक: ०२०-२९७०६६११ E-mail : acswopune@gmail.com

जा.क्र.सआसकपुणे/भासशि/महाडीबीटी/अर्ज/तपासणी/२०२०-२१/ 1231 दि. १९/०३/२०२१

**अत्यंत महत्त्वाचे/ प्रथम प्राधान्य**

प्रति,
प्राचार्य,
पुणे जिल्हा सर्व महाविद्यालये,

---

**विषयः-** सन २०१९-२० व २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील महाडीबीटी प्रणालीवरील अर्ज तात्काळ तपासणी करुन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयास पाठविणेबाबत .

**संदर्भ :-** मा.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई यांचे बैठकीतील निर्देश दि.१९.०३.२०२१.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, दि.१९.०३.२०२१ रोजी मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या निर्देशानुसार सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील अनु. जातीच्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे महाडीबीटी प्रणालीवर नोंदणीकृत झालेले अर्ज तात्काळ तपासणी करुन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयास पाठविणेबाबत कळविले आहे. आज अखेर पुणे जिल्ह्यातील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांचे महाडीबीटी प्रणालीवर अनु. जातीच्या विद्यार्थ्यांचे नोंदणीकृत अर्जाची संख्या फारच कमी असल्याने मा.सचिव, समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी महाडीबीटी प्रणालीवरील पुणे जिल्हयातील स्कॉलरशीप व फ्रीशीप असे एकुण नोंदणीकृत अर्जाची संख्या केवळ ३६९६७ इतकी आहे. सन २०२०-२१ या **शैक्षणिक वर्षातील प्रवेशित अनु. जातीच्या विद्यार्थ्यांचे अर्ज महाडीबीटी प्रणालीवर ३ दिवसांत नोंदणीकृत करुन सदरचे अर्ज दि. २२.०३.२०२१ पर्यंत तपासणी करुन सादर करावेत.**

**त्याचप्रमाणे सन २०१९-२० मधील विद्यार्थी स्तरावरील व महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित असलेले अर्ज विभागास फॉरवर्ड करण्याची अंतिम दिनांक २२ मार्च २०२१ ही आहे. त्यानंतर सदरचा अर्ज ग्राह्य ऑटो रीजेक्ट होणार आहे. सन २०१९-२० मधील विद्यार्थी व महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित अर्ज सूचना देऊन ही पुढे विहित वेळेत फॉरवर्ड झाला नाही व त्यामुळे अर्ज ऑटो रिजेक्ट झाला तर याची सर्वस्वी जबाबदारी** महाविद्यालयाचे प्राचार्य व सदर **विद्यार्थ्यांची राहील.** सदर बाबतीत आपल्या स्तरावरुन कोणतीही दिरंगाई झाल्यास व अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित राहुन, विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, संबंधित संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांची राहील व याबाबत सामाजिक न्याय विभागाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(संगिता डावखर)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, पुणे.

## Circulars about Scholarship and Freeships

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. राजर्षी छत्रपती शाहू शिक्षण शुल्क योजना/(९०५१/२१)/शिष्यवृत्ती/4687 दिनांक : २७.१२.२०२१

**तात्काळ/ईमेलद्वारा**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - राजर्षी छत्रपती शाहू शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेत नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत..**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/ शिष्य राशाशि/अभ्यासक्रम/१३८८६ दि. २.१२.२०२१.

उपरोक्त विषयाबाबत मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या संदर्भामध्ये नमूद केलेल्या पत्रान्वये राजर्षी छत्रपती शाहू शिक्षण शुल्क योजनेमध्ये नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करणेसाठी प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.

सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये आपल्या विद्यापीठामधील तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधील सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या माहितीबाबत सविस्तर अहवाल दि. २९.१२.२०२१ पर्यंत या कार्यालयास हार्ड कॉपी तसेच सॉफ्ट कॉपी स्वरुपात (मायक्रोसॉफ्ट एक्सेल फॉरमॅट मध्ये) jdpunescholarship@gmail.com या ईमेल आयडीवर सादर करण्यात यावा.

(डॉ. किरणकुमार बोंदर)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

# Circulars about Scholarship and Freeships

Back | Reply | Reply All | Forward | Move mail | Delete | Spam

## Fwd: MoMA: Date Extension under Post-Matric Scholarship Schemes for the Minority Students.

Pop-out | Print

From: Joint Director Higher Education <jdpunescholarship@gmail.com> on Thu, 31 Dec 2020 11:36:03 | Add to address book

To: You & 507 others | See Details

Dear Sir/Madam,

Kindly find below an email from Minority Affairs Department, they have extended the timelines of filling up of forms for fresh and renewal applications for **Post-Matric Scholarship schemes for the minority students** on NSP up to **20th January, 2021.**

---

**Sent:** Wednesday, December 30, 2020 5:17:53 PM
**Subject:** MoMA: Date Extension under Post-Matric and MCM Scholarship Schemes

Madam/Sir,

It is to inform that the DBT Mission has extended the timelines of filling up of forms for fresh and renewal applications for **Post-Matric Scholarship schemes and Merit-cum-Means based Scholarship Scheme** on NSP up to **20th January, 2021** and also extension of last date for first level of verification up to **5th February, 2021** and second level of verification up to **20th February, 2021.**

2. For Pre-Matric Scholarship Scheme, the date extension is under consideration.

Regards,
Aditya S. Singh,
Under Secretary (Scholarship),
Ministry of Minority Affairs,
New Delhi.

# Circulars about Scholarship and Freeships

Back Reply Reply All Forward Move mail Delete Spam

Pop-out Print

## अत्यंत महत्वाचे Pending Post Matric Scholarship Renewal application verification (do within Three days) on NSP :

From: Joint Director Higher Education <jdpunescholarship@gmail.com> on Fri, 18 Oct 2019 23:17:04 | Add to address book
To: You & 480 others | See Details

1 attachment

PMS-_Renwal_-20...lege_Level.xlsx
26.04 kB

Dear Sir/Madam,

**कृपया सोबत जोडलेल्या यादीमधील उच्च शिक्षण पुणे विभागांतर्गत सर्व महाविद्यालयांनी / संस्थांनी / विद्यापीठांनी तसेच अन्य सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी / संस्थांनी / विद्यापीठांनी तुमच्या एन एस पी पोर्टल वरील लॉगिन वर पेंडिंग असलेले सर्व स्कीमचे ऑनलाईन अॅप्लिकेशन तातडीने तपासून पुढे पाठवा तुमच्या लॉगीनवर एकही ऑनलाईन अॅप्लिकेशन प्रलंबित राहता कामा नये . एकही विद्यार्थ्यांचा ऑनलाईन अॅप्लिकेशन वेरिफिकेशन करीत प्रलंबित राहिल्यास त्याकरिता सदर महाविद्यालय / संस्थां/ विद्यापीठ जबाबदार राहील. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.**

Kindly find attached **Pending Post Matric Scholarship Renewal application verification on National Scholarship Portal for the year 2019-20.**

Note: Kindly contact all the mentioned colleges in Excel sheet which comes under your Region, and inform all of them to do **Renewal** application verification **within three days** on National Scholarship Portal ( Nodal Officer Form ). otherwise student may deprived from the scholarship.

Also tell them to verify **within three days regarding** other schemes **Central Sector, Disability** Students Renewal and Fresh **applications** on National Scholarship Portal.

Quick reply to Joint Director Higher Education <jdpunescholarship@gmail.com>

# Circulars about Scholarship and Freeships

Back Reply Reply All Forward Move mail Delete Spam

Pop-out Print

## Scholarship for students who have appeared 12th std exam

From: Amit <amit@resourcefuleducationfoundation.com> on Tue, 05 Mar 2019 17:20:14 | Add to address book

To: You & 1 other | See Details

1 attachment

Student_form.docx
57.28 kB

Dear Sir,

This email is for students who have appeared for 12th standard exam, but are from poor family background and need financial assistance for higher education to complete Graduation after 12th standard.

We request you to share / forward this email within your group / students group from poor family background, so that they can apply and get benefit of scholarship which we provide

Request you to share the attached form with your students group and inform them to fill the form and send it back to - amit@resourcefuleducationfoundation.com

Awaiting your response

Regards
Amit

7499918170 / 7387045887

C.S.M.'S ARTS & COMMERCE COLLEGE, CHAKAN

Welcome, DH30418_Clerk ∨ Home

आपले सरकार महाDBT Scrutiny Portal

Welcome to Aaple Sarkar Direct Benefit Transfer Scru

- Home
- Scrutiny
- Reports
  - DBT Dashboard
  - Student-Institute Detail Reason Report
  - Status wise Application Detail Report
  - Student Disbursement Report
  - Institute Disbursement Report
- Institute
  - Institute Profile
  - Update Aadhaar Details
  - Reset Mobile Number
- Grievance/Support
  - Grievance/Suggestions
  - Grievances Dashboard
- User Manuals
  - Institute Updation Profile Manual

*All reports last updated on 05-07-2023 00:00:00

## DBT Dashboard [Last Report Updated: 05-07-2023 08:04:16]

Financial Year: 2018-2019

Expand All | Export to XLS

Department | Scheme | Division | District | Taluka | Institute | Fresh/Renewal | Stream | Religion

| Department | Scheme | Application Received | Cancelled | Net Received | Rejected | Sent back to applicant | Approved By Institute | Pending At Institute | Approved By Department | Pending At Department | Not Alloted | Alloted | Student Allotted Amount | Institute Allotted Amount | Total Allotted Amount | Bill Generated First Installment | G I |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ⊟ Directorate of Higher Education | ⊞ Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Scheme | 17 | 1 | 16 | 16 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | ₹ 0 | ₹ 0 | ₹ 0 | 0 | |
| ⊟ OBC, SEBC, VJNT & SBC Welfare Department | ⊞ Post Matric Scholarship to OBC Students | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | ₹ 0 | ₹ 0 | ₹ 0 | 0 | |
| | ⊞ Tuition Fees and Examination Fees to OBC Students | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | ₹ 0 | ₹ 0 | ₹ 0 | 0 | |
| | ⊞ Tuition Fees and Examination Fees to VJNT Students | 3 | 0 | 3 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | ₹ 0 | ₹ 0 | ₹ 0 | 0 | |
| OBC, SEBC, VJNT & SBC Welfare Department Total | | 5 | 0 | 5 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | ₹ 0 | ₹ 0 | ₹ 0 | 0 | |
| ⊟ Social Justice and Special Assistance Department | ⊞ Government of India Post-Matric Scholarship | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | ₹ 0 | ₹ 0 | ₹ 0 | 0 | |
| Grand Total | | 23 | 1 | 22 | 22 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | ₹ 0 | ₹ 0 | ₹ 0 | 0 | |

# Sanction letter of scholarship and freeships

C.S.M.'S ARTS & COMMERCE COLLEGE, CHAKAN

Welcome, DH30418_Clerk Home

आपले सरकार महाDBT Scrutiny Portal

fit Transfer Scrutiny Portal

- Home
- Scrutiny
- Reports
  - DBT Dashboard
  - Student-Institute Detail Reason Report
  - Status wise Application Detail Report
  - Student Disbursement Report
  - Institute Disbursement Report
- Institute
  - Institute Profile
  - Update Aadhaar Details
  - Reset Mobile Number
- Grievance/Support
  - Grievance/Suggestions
  - Grievances Dashboard
- User Manuals

*All reports last updated on 05-07-2023 00:00:00

## DBT Dashboard [Last Report Updated: 05-07-2023 08:04:16]

Financial Year: 2019-2020

Expand All | Export to XLS

Department | Scheme | Division | District | Taluka | Institute | Fresh/Renewal | Stream | Religion

| Department | Scheme | Application Received | Cancelled | Net Received | Rejected | Sent back to applicant | Approved By Institute | Pending At Institute | Approved By Department | Pending At Department | Not Alloted | Alloted | Student Allotted Amount | Institute Allotted Amount | Total Allotted Amount | Bill Generated First Installment |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ⊟ Social Justice and Special Assistance Department | ⊞ Government of India Post-Matric Scholarship | 4 | 0 | 4 | 0 | 0 | 4 | 0 | 4 | 0 | 0 | 4 | ₹ 19,420 | ₹ 2,400 | ₹ 21,820 | 1 |
| ⊟ Tribal Development Department | ⊞ Post Matric Scholarship Scheme (Government Of India ) | 2 | 0 | 2 | 0 | 0 | 2 | 0 | 2 | 0 | 0 | 2 | ₹ 8,134 | ₹ 2,746 | ₹ 10,880 | 2 |
| Grand Total | | 6 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | ₹ 27,554 | ₹ 5,146 | ₹ 32,700 | 3 |

# Sanction letter of scholarship and freeships

≡ C.S.M.'S ARTS & COMMERCE COLLEGE, CHAKAN — Welcome, DH30418_Clerk — Home

आपले सरकार महाDBT Scrutiny Portal

Welcome to Aaple Sarkar Direct Benefit Transfer Scrutiny Portal

- Home
- Scrutiny
- Reports
  - DBT Dashboard
  - Student-Institute Detail Reason Report
  - Status wise Application Detail Report
  - Student Disbursement Report
  - Institute Disbursement Report
- Institute
  - Institute Profile
  - Update Aadhaar Details
  - Reset Mobile Number
- Grievance/Support
  - Grievance/Suggestions
  - Grievances Dashboard
- User Manuals

*All reports last updated on 05-07-2023 00:00:00

**DBT Dashboard** [Last Report Updated: 05-07-2023 08:04:16]


Financial Year: 2021-2022

Expand All | Export to XLS

Department | Scheme | Division | District | Taluka | Institute | Fresh/Renewal | Stream | Religion

| | Application Received | Cancelled | Net Received | Rejected | Sent back to applicant | Approved By Institute | Pending At Institute | Approved By Department | Pending At Department | Not Alloted | Alloted | Student Allotted Amount | Institute Allotted Amount | Total Allotted Amount | Bill Generated First Installment |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ⊞ Directorate of Higher Education | 22 | 2 | 20 | 0 | 0 | 20 | 0 | 20 | 0 | 0 | 20 | ₹ 16,120 | ₹ 46,800 | ₹ 62,920 | 20 |
| ⊞ OBC, SEBC, VJNT & SBC Welfare Department | 6 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | ₹ 18,190 | ₹ 4,560 | ₹ 22,750 | 6 |
| ⊞ Social Justice and Special Assistance Department | 6 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | ₹ 10,808 | ₹ 4,762 | ₹ 38,925 | 6 |
| ⊞ Tribal Development Department | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | ₹ 5,480 | ₹ 0 | ₹ 5,480 | 1 |
| Grand Total | 35 | 2 | 33 | 0 | 0 | 33 | 0 | 33 | 0 | 0 | 33 | ₹ 50,598 | ₹ 56,122 | ₹ 1,30,075 | 33 |

# Sanction letter of scholarship and freeships




| | Application Received | Cancelled | Net Received | Rejected | Sent back to applicant | Approved By Institute | Pending At Institute | Approved By Department | Pending At Department | Not Alloted | Alloted | Student Allotted Amount | Institute Allotted Amount | Total Allotted Amount | Bill Generated First Installment |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ⊞ Directorate of Higher Education | 8 | 2 | 6 | 0 | 0 | 6 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | ₹ 5,520 | ₹ 58,400 | ₹ 63,920 | 6 |
| ⊞ OBC, SEBC, VJNT & SBC Welfare Department | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | ₹ 4,715 | ₹ 0 | ₹ 4,715 | 0 |
| ⊞ Social Justice and Special Assistance Department | 10 | 2 | 8 | 0 | 0 | 7 | 1 | 7 | 0 | 0 | 7 | ₹ 11,332 | ₹ 5,700 | ₹ 42,580 | 4 |
| ⊞ Tribal Development Department | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | ₹ 5,740 | ₹ 0 | ₹ 5,740 | 0 |
| Grand Total | 20 | 4 | 16 | 0 | 0 | 15 | 1 | 15 | 0 | 0 | 15 | ₹ 27,307 | ₹ 64,100 | ₹ 1,16,955 | 10 |